GR-200407261720570010500

अध्ययन अक्षमता असलेल्या इयत्ता १२ वी पर्यंतच्या विद्यार्थ्यांना शैक्षणिक वर्ष २००३-०४ मध्ये द्यावयाच्या सवलतीबाबत...

प्राथ

**महाराष्ट्र शासन**

शालेय शिक्षण विभाग,

शासन शुद्धीपत्रक क्रमांक : संकीर्ण १०२१/(१५/२००१)/प्राशि-५

मंत्रालय विस्तार भवन,मुंबई-३२

दिनांक : १४ जुलै, २००४

वाचा :- १) शासन परिपत्रक, शालेय शिक्षण विभाग, क्र. संकीर्ण १०२१/(१५/२००१)/प्राशि-५, दिनांक २३ सप्टेंबर, २००३

२) शिक्षण उपसंचालक, बृहन्मुंबई यांचे क्र. शिउसं/माध्य-११/१४०६-०७, दि. ३.७.२००४ चे पत्र

३) शासन परिपत्रक, शालेय शिक्षण विभाग, क्रमांक : संकीर्ण १०२१/(१५/२००१)/प्राशि-५, दिनांक : १३ जुलै, २००३

**शुद्धीपत्रक** :- शासन परिपत्रक समक्रमांक दिनांक १३ जुलै, २००३ ऐवजी दिनांक १३ जुलै, २००४ असे वाचावे.

२. शासन परिपत्रक समक्रमांक दिनांक १३ जुलै, २००४ अन्वये अध्ययन अक्षमता असलेल्या विद्यार्थ्यांना दिलेल्या सवलतीचा लाभ दिनांक १३ जुलै, २००४ पर्यंत वैद्यकीय प्रमाणपत्रे सादर करण्यात येणा-या प्रकरणांपुरताच मर्यादित राहील. मात्र शासन परिपत्रक समक्रमांक दिनांक २३.९.२००३ मधील तरतुदीनुसार संबंधित विद्यार्थ्यांच्या परीक्षा घेणे अनिवार्य राहील.

३. या परिपत्रकान्वये दिलेली सवलत महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळामार्फत घेतल्या जाणा-या परीक्षांकरिता लागू होणार नाही.

४. सन २००४-२००५ या शैक्षणिक वर्षापासून अध्ययन अक्षमता असलेल्या ज्या विद्यार्थ्यांना शासन परिपत्रक समक्रमांक दिनांक २३.९.२००३ अन्वये विहित केलेल्या सवलतीचा फायदा घ्यावयाचा असेल अशा विद्यार्थ्यांच्या पालकांनी संबंधित शाळांकडे, पहिल्या घटक चाचणीपूर्वी, परंतु विभागीय शिक्षण उपसंचालकांनी विहित केलेल्या मुदतीत अध्ययन अक्षमतेबाबतची सक्षम वैद्यकीय अधिका-यांनी निर्गमित केलेली वैद्यकीय प्रमाणपत्रे सादर करणे अनिवार्य राहील.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

( भा. ज. गाडेकर )

कक्ष अधिकारी, महाराष्ट्र शासन.

प्रत, माहितीसाठी व आवश्यक त्या कार्यवाहीसाठी अग्रेषित.

शिक्षण संचालक (प्राथमिक), महाराष्ट्र राज्य, पुणे

शिक्षण संचालक (माध्यमिक), महाराष्ट्र राज्य, पुणे.

संचालक, महाराष्ट्र राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, पुणे

सर्व विभागीय शिक्षण उपसंचालक

अध्यक्ष, महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, शिवाजीनगर, पुणे

सर्व विभागीय सचिव, महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ

सर्व शिक्षणाधिकारी (प्राथमिक / माध्यमिक)

ग्राम विकास विभाग/आदिवासी विकास विभाग/सामाजिक न्याय विभाग/सार्वजनिक आरोग्य विभाग, मंत्रालय, मुंबई

सर्व जिल्ह्यांचे जिल्हा शल्य चिकित्सक

शालेय शिक्षण विभागातील सर्व कार्यासने